International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.5 July – Aug. 2020

# माहितीचा अधिकार

डॉ. आकाश शेषराव बांगर
संशोधक विध्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली

**प्रस्तावना**

आज घडीला बदलत्या परिस्थितीनुसार शासकीय संस्थांची जबाबदारी वाढत चाललेली आहे. अधिकाधिक सुख सोयी लोकांना पुरवण्याकडे शासकीय संस्थांचा कल वाढलेला दिसून येतो. याचबरोबर सामान्य जनतेच्या अपेक्षा ही शासनात प्रतिउंचावल्या आहेत. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यावर केंद्र सरकारने भर दिलेला आहे. त्यामुळे शासनाच्या कामाचा दर्जा वाढलेला आपणास दिसून येतो. ज्या प्रशासक वर्गाकडे शासनाच्या प्रत्यक्ष धोरणांची अंमलबजावणी असते ती प्रशासन व्यवस्था शासन आणि जनता यांच्यामधील दुवा म्हणून कार्य करीत असते. 'सुप्रशासन' यासारखी शब्दरचना वापरलेली दिसते ती प्रशासकीय लोकांकडून काम प्रभावी, पारदर्शकपणे होण्यासाठीच. देशाची विशालता, सामाजिक, आर्थिक विविधता, परंपरा आणि जागतिक स्तरावर घडून येत असलेल्या घटनांचा दबाव हा प्रशासनासमोर अनेक विविध आव्हाने उभी करत असतोच. प्रशासन व्यवस्थेचे आद्य कर्तव्य म्हणजे, प्रजासत्ताक संविधानांतर्गत प्रशासकीय व्यवस्थेने भारतातील प्रत्येक नागरिकास गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याची व्यवस्था उपलब्ध करून देणे होय. २१ व्या शतकात लोकशाही, समाजवाद, कल्याणकारी राज्य आणि विकास प्रशासन यासारख्या संकल्पना स्वीकारल्या गेल्यामुळे तसेच जागतिकीकरण, खाजगीकरण व उधारीकरणामुळे शासनाच्या कार्यक्षेत्रामध्ये नक्कीच वाढ झालेली आहे. याबरोबरच प्रशासकीय व्यवस्थेच्या वाढत्या जबाबदारी सोबतच दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार, कामाची टाळाटाळ अशा बाबींमध्ये देखील वाढ झालेली आहे. त्यामुळेच जनतेच्या विकासात्मक कार्यक्रमांना अडवणूक निर्माण झाली आहे. या समस्येवर उपाय म्हणूनच व बाबू लोकांच्या मनमानी वृत्तीला आळा घालण्यासाठी त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'माहितीचा अधिकार अधिनियम २००५' अस्तित्वात आला आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश**

१) माहिती अधिकार अधिनियम कायदा – २००५ ची पार्श्वभूमी अभ्यासणे.
२) माहिती अधिकार अधिनियम कायदा – २००५ कायद्याचा उद्देश अभ्यासणे
३) माहिती अधिकार अधिनियम कायदा – २००५ शी संबंधित काही महत्त्वपूर्ण बाबी अभ्यासणे

**माहितीचे संकलन आणि विश्लेषण**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विविध संदर्भ ग्रंथ साप्ताहिके मासिके इंटरनेटवरील वेबसाईट, या दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला असून याठिकाणी आशय विश्लेषणाचे तंत्र वापरून मुद्देसूद पद्धतीने मांडणी करण्यात आलेली आहे.

**माहिती अधिकार पार्श्वभूमी**

भारतामध्ये माहिती अधिकार कायद्याची चर्चा ब्रिटिशांच्या गोपनीतेच्या कायद्याच्या माध्यमातून सुरू झाली.

ब्रिटिश शासन व्यवस्थेचा पाया म्हणजेच १९२३ चा गोपनीयतेचा कायदा. पहिल्या महायुद्धाने निर्माण झालेल्या परिस्थितीचे ते अपत्य होते. युद्धकाळात सरकारी कागदपत्रे माहिती शत्रूपर्यंत पोहोचू नयेत याची काळजी घेतली जात होती. संरक्षण विषयक हालचालीवरचना आणि पूर्वतयारी याबद्दल गोपनीयता राखणे हा या कायद्याचा हेतू होता. पण युद्ध समाप्तीनंतर गोपनीयतेचा कायदा तसाच राहिला. ब्रिटिश देश सोडून गेल्यानंतर हा कायदा भारतीयांकडे हातांतरीत झाला. भारतीय प्रशासनाने या कायद्याचा उपयोग स्वतःच्या स्वार्थासाठी केला. जनहितासाठी जनतेला जी माहिती असाव्यास पाहिजे, अशी माहिती प्रशासक कायद्याचा हवाला देऊन दडवू लागले. सामान्य जनतेला ब्रिटिश धरणास सुरुवात झाली. भ्रष्टाचार, लाचलुचपत, दप्तर दिरंगाई, अरेरावी ही सारी या गोपनी त्याच्या कायद्याची पिलावळ आहे. २००५ साली माहिती अधिकार अधिनियम अमलात आल्यानंतर १९२३ चा गुप्तहेर कायदा गैर लागू झाला.

माहिती अधिकार कायद्याची सुरुवात भारतात पर्यावरणाच्या आंदोलनाच्या संदर्भात भोपाळ वायू गळती प्रकरणाच्या माध्यमातून १९९४ सालीच झाली. परंतु माहिती अधिकार कायद्यासंबंधी स्पष्ट आणि ठोस आंदोलन हे राजस्थानमधील शेतकऱ्यांनी चालवले. या आंदोलनाचे नेतृत्व अरुणा रॉय व निखिल डे यांनी केले. या आंदोलनाचे घोषवाक्य 'हमारा पैसा, हमारा हिसाब' असे होते. यानंतरच भारतातील विविध राज्यांमध्ये माहिती अधिकार कायद्याच्या चळवळीने वेग घेतला. २००० मध्ये राजस्थान,२००० मध्ये कर्नाटक,२००३ मध्ये मध्यप्रदेश,२००२ मध्ये महाराष्ट्र, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या माध्यमातून माहिती अधिकार कायद्याच्या चळवळीने चांगलाच वेग घेतला.

माहिती अधिकार कायद्याचा भारतीय राज्यघटनेमध्ये अंतर्भाव आहे. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या प्रकरणात नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकाराच्या यादीत माहितीच्या अधिकाराचा समावेश नसला तरी नागरिकांच्या उच्चार आणि विचार स्वातंत्र्याच्या अधिकारात हा अधिकार समाविष्ट आहे, अशी भूमिका अनेकांनी घेतलेली आपल्याला दिसून येते. भारतीय घटनेच्या तिसऱ्या भागात नमूद करण्यात आलेल्या मूलभूत अधिकाऱ्यांमध्ये स्वातंत्र्याच्या अधिकाराचा समावेश करण्यात आला आहे. कलम १९(१) अ मध्ये नागरिकांना भाषण आणि अभिव्यक्ती यांचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. समतेचा अधिकार आणि कलम 21 मधील व्यक्तिगत स्वातंत्र्याचा किंवा जगण्याच्या अधिकारांमध्ये गर्भित अर्थ मान्य केला असल्यामुळे त्याचा वेगळा व खास उल्लेख करण्याचे कारण नाही, असा खुलासा संविधान सभेने संघटनेचा

शिल्पकारांनी केला होता. माहितीचा अधिकार, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य समाविष्ट होतो, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश पी एन भगवती यांनी एस पी गुप्ता विरुद्ध संघ शासन या खटल्याच्या निकाला पत्रात दिला. माहिती अधिकार अधिनियम २००५ हा १५ जून २००५ रोजी संमत झालेला आहे.

**माहिती अधिकार अधिनियम उद्देश**

१) शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामकाजाला गती देणे.

२) शासकीय कामकाजाचा लेखाजोखा सर्वांसाठी खुला करणे.

३) शासकीय कामकाजामध्ये पारदर्शकता निर्माण करणे.

४) लाचलुचपत, भ्रष्टाचार, दप्तर दिरंगाई, लालफितीच्या कारभाराला आळा घालणे.

५) शासनाच्या निधीचा विनियोग योग्य प्रकारे होतो अथवा नाही याचा आढावा घेणे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या अधिनियमांतर्गत प्रत्येक कार्याची व कामकाजाची कलमवार माहिती दिलेली आहे.संगणकीय सुविधा, स्वयप्रेरणेने प्रकाशित करावयाची माहिती, गुप्ततेची कालमर्यादा इत्यादीची माहिती दिली जाऊ शकत नाही. त्या बाबी दंडात्मक कार्यवाही, अपिलाची तरतूद, या सर्व बाबींचे स्पष्टीकरण कलमवार करण्यात आलेले आहे. सर्वसामान्य माणसाला माहिती न मागता सुद्धा संबंधित प्रशासकीय किंवा शासकीय संस्थेला स्वतःहून काही माहिती प्रकट करणे गरजेचे आहे. शासकीय प्राधिकरणे अशी माहिती प्रगट करीत नसल्यामुळे सामान्य माणसाला माहिती मागवावी लागते त्या दृष्टिकोनातून पुढील प्रमाणे महत्वपूर्ण माहिती सांगता येते.

- माहिती अधिकार अधिनियम २००५ कायद्याअंतर्गत कलम ४ हा कायदा गाभा आहे.
- लोकांना या अधिनियमाचा माहिती मिळण्यासाठी कमीत कमी आधार घ्यावा लागतो. यासाठी नियमित कालांतराने विविध साधनांद्वारे स्वतःहून माहिती पुरवण्यासाठी प्रयत्न करण्याचे बंधन प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणावर या कायद्याने आहे.

हा अधिनियम अस्तित्वात आल्यापासून १२० दिवसांच्या आत प्रत्येक प्राधिकरणाने आपल्या संबंधित पुढील १७ मुद्द्यांवरील माहिती प्रसिद्ध करणे व दरवर्षी ती अद्यावत करणे बंधनकारक आहे.

१) कार्य, रचना व कर्तव्ये यांचा तपशील.

२) अधिकाऱ्यांचे अधिकार आणि कर्मचाऱ्यांची कर्तव्ये.

३) निर्णय प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, पर्यवेक्षण व उत्तरदायित्व प्रणाली.

४) सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी गठित झालेल्या मंडळाचे परिषदांचे समित्यांची तपशील आणि त्यांच्या बैठका जनतेस खुल्या आहेत का ते तसेच बैठकीची कार्यप्रवृत्ती जनतेला पहावयास उपलब्ध आहेत का नाही याबाबतच्या तपशील.

५) कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम,विनियम, सूचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख.

६) नियंत्रणाखालील दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण.

७) अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी.

८) कोणतेही धोरण तयार करण्याचा व त्याची अंमलबजावणी करण्यासंबंधात जनतेशी विचारविनिमय करण्यासाठी आणि जनतेकडून निवेदन मागवण्याबाबत अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशील.

९) स्वतःची कार्य पार पाडण्यासाठी ठरवण्यात आलेली मानके.

१०)सर्व योजनांचा तपशील अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या निधी प्रस्तावित खर्च व प्रत्यक्षात वितरित झालेल्या रकमांचा अहवाल.

११) प्रत्येक प्राधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन तसेच प्राधिकरणाच्या विनिमयांमध्ये तरतूद गेल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पद्धती.

१२) ज्या व्यक्तींना सवलती परवाने किंवा अधिकार पदे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील.

१३) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध असलेल्या माहितीच्या तपशील.

१४) अर्थ सहाय्य कार्यक्रमाची पद्धती, वाटप केले रकमा आणि अशा अनुदानाच्या लाभार्थींचा तपशील.

१५) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि अन्य तपशील.

१६) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येणाऱ्या ग्रंथालयांच्या किंवा वाचनालयांच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील.

१७) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.

वरील बाबी प्रशासकीय कर्मचाऱ्यांना स्वतःहून प्रकाशित करणे गरजेचे असले तरीही अशी माहिती कर्मचारी देण्यासाठी टारझन करतात व सामान्य नागरिकांना माहिती वाचून वंचित ठेवतात. प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी आपले काम पारदर्शकपणे, तत्परतेने केल्या सामान्य माणसांनी यासंबंधी विचारणा गरजेचे वाटले नसते.

**निष्कर्ष**

सुशासना समोरील समस्या म्हणजे आधुनिक समाजात नैतिक मूल्यांचे होत चाललेले पतन आणि भोगवादी प्रवृत्ती यात होत चाललेली वाढ ही आहे. कारण की शासनातून प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा व सचोटी हे गुण प्रशासनातून हद्दपार झालेले दिसून येत आहेत. विकासाच्या प्रक्रियेत नोकरशाहीच्या लालफीतशाहीमुळे अडथळे निर्माण झाले आहेत. प्रत्येक योजना कार्यक्रमांना नियमांच्या पळवटा दाखवून गुंडाळून ठेवलेल्या आहेत. शासनाच्या अशा धोरणांमुळे जनता कमालीची उदासीन आहे. ती अधिकार कायद्याचा वापर खऱ्या अर्थाने शासनाच्या कामांना गती देण्यासाठी भारतातील नागरिकांनी करणे गरजेचे आहे. आज भारतामध्ये बऱ्याचशा योजनांचा भ्रष्टाचार प्रशासनाचा योग्य कारभार उघडकीस आलेला आहेच. म्हणूनच माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून शासनाच्या मनमानी वृत्तीवर बंधन घालण्याचं काम होत आहे. या कायद्याचा वापर करून माहिती मागविणाऱ्या काही लोकांवर हल्ले होण्याचा प्रमाण वाढले आहे तर काही सामाजिक कार्यकर्ते मृत्युमुखी देखील पडले आहेत. अपप्रवृत्तींवर नियंत्रण

ठेवण्यासाठी आणि आपले अधिकार मिळवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन अशा दडपशाहीचा आणि अन्यायाचा विरोध केला पाहिजे आणि माहिती अधिकार कायद्याचा वेळोवेळी योग्य वापर केला पाहिजे.

**संदर्भग्रंथ सूची**


१) माहितीचा अधिकार - शेलकर अभया, औरंगाबाद

२) माहितीचा अधिकार - मोठा मंजुषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

३) माहितीचा अधिकार – य.दि.फडके, अक्षर प्रकाशन,मुंबई

४) माहितीचा अधिकार - अशोक देशपांडे, राजहंस प्रकाशन, पुणे

५) माहितीचा अधिकार - एस.एस.जाधव,राजश्री प्रकाशन, धर्माबाद

६) माहितीचा अधिकार - नरेंद्र चपळगावकर, राळेगणसिद्धी परिवार, अहमदनगर

७) माहितीचा अधिकार - डी.स.कुलकर्णी, मनोरमा प्रकाशन, मुंबई.

८) माहिती अधिकाराची यशोगाथा – मनोज आवाळे, आदिश्रेय प्रकाशन, पुणे